महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे—०४

• प्रकटन •

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु—मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे सादर करावयाच्या नियमित शुल्काच्या तारखांना मुदतवाढीबाबत व विलंब शुल्काच्या तारखांबाबत**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु—मार्च २०२५ च्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे **SARAL DATABASE** वरून ऑनलाईन पध्दतीने त्यांचे उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत प्रचलित पध्दतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरून दि.३०/१०/२०२४ पर्यंत भरावयाची होती. सदर तारखांना मुदतवाढ देण्यात येत असून नियमित शुल्क मुदतवाढ तारखा व विलंब शुल्क तारखा तसेच शुल्क व कागदपत्रे जमा करावयाच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे —

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी RTGS/NEFT पावती / चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख |
|---|---|---|
| नियमित शुल्क (मुदतवाढ) | गुरूवार, दिनांक ३१/१०/२०२४ ते गुरूवार, दिनांक १४/११/२०२४ | बुधवार दि.२७/११/२०२४ |
| विलंब शुल्क | शुक्रवार, दिनांक १५/११/२०२४ ते शुक्रवार, दिनांक २२/११/२०२४ | |

सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आवेदनपत्रे भरण्यापूर्वी College Profile मध्ये कॉलेज, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक याबाबतची योग्य माहिती भरुन मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमिट केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगिन (College Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत उच्च माध्यमिक शाळा प्रमुख/प्राचार्य यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १२ वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे —

१ सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी Website द्वारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेमधून RTGS/NEFT द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा.

२ यापूर्वी वापरात असणाऱ्या Bank Of India/ HDFC Bank/Axis Bank च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

३ उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

४ विलंब शुल्काने आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

५ अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे—०४.

दिनांक —२९/१०/२०२४

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/3356
दिनांक :- 30 OCT 2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या नियमित शुल्काच्या तारखांना मुदतवाढीबाबत व विलंब शुल्काच्या तारखांबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखांबाबत उचित कार्यवाही करावी.

१) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी SARAL DATABASE मध्ये विद्यार्थ्यांची नोंद असणे आवश्यक आहे. सदर SARAL DATABASE वरुनच नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्याची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे.

२) व्यवसाय अभ्यासक्रम शाखेच्या (HSC Vocational)/ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (ITI) नियमित विद्यार्थ्यांची माहिती SARAL DATABASE मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे निर्यामित पध्दतीने ऑनलाईन भरावयाची आहेत.

३) चलनाची प्रत व Pre-list विहित मुदतीमध्ये विभागीय मंडळास जमा करावे . रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामध्ये समाविष्ट सर्व विद्यार्थ्यांच्या application status मध्ये "Draft" चा "Sent to Board" व Payment status मध्ये "Not Paid" चा "Paid" असा बदल आला आहे का याची खातरजमा करावी. अशा "Sent to Board" व "Paid" Status प्राप्त झालेली आवेदनपत्रे मंडळास प्राप्त झाले असे गृहीत धरुन त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल व उर्वरित आवेदनपत्रे Draft Mode मध्येच राहतील व त्याबाबत कोणतीही कार्यवाही होणार नाही.

४) कनिष्ठ महाविद्यालयांना भरलेल्या आवेदनपत्रांमधून निवड करुन एक किंवा एकापेक्षा अधिक चलने तयार करता येतील. परंतू शुल्काचा भरणा करताना प्रत्येक चलन स्वतंत्रपणे भरण्यात यावे. जेणेकरुन त्यात समाविष्ट विद्यार्थ्यांचे Status Update होईल.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**